# निर्भय समाज, सशक्त देश

लोकसभा निवडणुकीत मुख्य लढाई एनडीए व युपीए यांच्यातच आहे. डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली युपीएमध्ये सहभागी झालेल्या सर्वच पक्षांनी एकत्रितपणे निवडणूक लढवावी अशी माझी इच्छा होती. ती मी जाहीरपणाने अनेकदा बोलूनही दाखविली होती. परंतु ती प्रत्यक्षात काही कारणांमुळे येऊ शकली नाही. असे असले तरीही ज्या दिवशी निवडणुका संपतील आणि सरकार बनविण्याची वेळ येईल तेव्हा युपीएमधील सर्व घटकपक्ष पुन्हा एकत्र बसतील आणि पुढची पाच वर्षे स्थिरता देणारे सरकार स्थापन होईल असा मला विश्वास आहे. या दृष्टीने युपीएमध्ये सहभागी झालेले पक्ष व त्यांचे उमेदवार लोक मोठ्या प्रमाणावर निवडून देतील असा मला विश्वास आहे. आपला सगळ्यांचा संघर्ष एनडीएशी आहे. पंतप्रधान पदाचे उमेदवार म्हणून अडवानींना प्रोजेक्ट करण्याची भूमिका एनडीएने घेतली आहे. काँग्रेसनेही जाहीरनामा प्रसिद्ध करताना डॉ. मनमोहनसिंग यांना पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून प्रोजेक्ट केलेले आहे. पंतप्रधानपदासाठी कुणी कुणाला प्रोजेक्ट करावे हा ज्या त्या पक्षाचा व्यक्तिगत प्रश्न आहे. एनडीएने लालकृष्ण अडवानी यांना प्रोजेक्ट करण्याची जी भूमिका घेतली तो त्यांचा व्यक्तिगत प्रश्न असला तरीही पंतप्रधान निवडताना त्या पक्षाची धोरणे आणि राष्ट्रीय गरज बघितली पाहिजे. सर्व माणसामाणसांत, जातीजातीत व धर्माधर्मांत एकोपा, एकसंधपणा टिकवू शकेल व अशी कुवत ज्यांच्यामध्ये असेल अशाच लोकांच्या हातात देशाची सत्ता गेली पाहिजे. ही कुवत अडवानी व त्यांच्या माणसांमध्ये आहे असे काही दिसत नाही.




**राष्ट्रवादी काँग्रेस–काँग्रेस आणि रिपब्लिकन आघाडीच्या प्रचाराचा शुभारंभ करताना ज्येष्ठ नेते शरद पवार. (डावीकडून) पतंगराव कदम, माणिकराव ठाकरे, रामदास आठवले, मुख्यमंत्री अशोक चव्हाण, श्री. पवार, सुरेश कलमाडी, सुप्रिया सुळे, पुण्याच्या महापौर राजलक्ष्मी भोसले.**

गुजरात हायकोर्टाने काय सांगितले? उच्च शिक्षण व महिला व बालकल्याण मंत्री मायाबेन कोडनानी यांचा जामीन कोर्टाने का रद्द केला? अहमदाबादमधील नरोडा पटिया व नरोडा ग्राम या वस्तीत उफाळलेल्या मुस्लिमविरोधी दंगलीत १०६ लोकांना ठार मारण्यात आले त्या १०६ लोकांच्या हत्येला जबाबदार असल्याबद्दल संबंधित मंत्र्यांना अटक करण्याची भूमिका घ्यावी लागली. शेकडो लोकांचे बळी घेणारे नेते गुजरात सरकारच्या मंत्रिमंडळात आहेत आणि शेकडो लोकांच्या हत्येला जबाबदार असणारे लोक जेव्हा मंत्रिमंडळात बसतात तेव्हा सामाजिक ऐक्याच्या बाबतीत हे सरकार काय भूमिका घेणार? मुस्लिम समाजातील ६८ वर्षांच्या एका माजी काँग्रेस खासदाराला अहमदाबादमध्ये जिवंत जाळण्यात आले. त्यांना कुणीही संरक्षण दिले नाही आणि गुजरातमध्ये घडलेल्या जातीय दंगली व गोध्रा हत्याकांड यांची उदाहरणे आपल्यासमोर आहेत. असे हत्याकांड घडवून आणणारे लोक उद्याचा देश चालवायचा अधिकार मागतायेत. किती उदाहरणे देऊ.

कसली तरुण पिढी व विचारधारा आपण जनतेच्या समोर आणतो आहे. वरुण गांधींची हात तोडण्याची भाषा किती कडवी व टोकाची आहे. सुरवातीला दोन दिवस त्यांच्या पाठीशी उभे राहण्याची भूमिका भाजपने घेतली नाही पण नंतर मात्र लगेचच राजनाथसिंह यांनी वरुणच्या भूमिकेला पाठिंबा दिला आणि आता भाजपही वरुणच्याच पाठीशी उभा आहे. हातपाय तोडण्यासाठी राजकारणात जाण्याची ज्यांची भाषा आहे ते देशात ऐक्याचे वातावरण ठेवू शकणार नाहीत. राष्ट्रीय ऐक्याला सुरुंग लावण्याचे काम भारतीय जनता पक्ष करीत आहे. म्हणून त्यांना शंभर टक्के पराभूत करण्याचे काम आपण केले पाहिजे. या धर्मांध व जातीयवादी शक्ती आणि प्रवृत्ती रोखणे ही राष्ट्रीय गरज आहे आणि तसे घडले तरच समाजात आत्मविश्वासाचे व निर्भयतेचे वातावरण निर्माण होऊ शकेल.

डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली पाच वर्षांचा कारभार झाला देशात. १८ पक्षांचा पाठिंबा घेऊन त्यांनी सरकार चालविले. पण मी आवर्जून व अतिशय प्रामाणिकपणे आपल्याला सांगू इच्छितो, की मंत्रिमंडळात मतभेद झाले किंवा कुणाला विश्वासात घेतले नाही असा एकही प्रसंग आला नाही. पंतप्रधानपदाची जबाबदारी डॉ. मनमोहनसिंग यांनी समर्थपणे सांभाळून देशाच्या विकासाला प्रचंड गती दिली. तीच गती आपल्याला यापुढेही कायम ठेवायची आहे. ६ ते ८.५ टक्क्यांपर्यंत कधीही विकासाचा दर गेलेला नव्हता. गेल्या ५ वर्षांत युपीए सरकारने जे प्रचंड विकासाचे काम केले ते लक्षात घेऊन याच प्रवृत्तीला खऱ्या अर्थाने सत्ता देण्याचे काम केले पाहिजे. हा देश ७० टक्के खेड्यात राहणाऱ्या, ६२ टक्के शेतीवर अवलंबून असलेल्या आणि ८२ टक्के अल्पभूधारक असलेल्या शेतकऱ्यांचा देश आहे. आजपर्यंत त्यांचे ७१ हजार कोटी रुपयांचे कर्ज कोणी माफ केले होते? स्वातंत्र्यानंतर या देशात हे कधीही घडले नव्हते. युपीए सरकारने पहिल्यांदा साडेचार कोटी शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली. महाराष्ट्र सरकारनेही स्वतःच्या तिजोरीतून ६ हजार कोटींची जबाबदारी उचलली. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना जवळपास १४ हजार कोटींची कर्जमाफी मिळालेली आहे.

७० टक्के धान्य अजूनही गोदामात पडून आहे. माझ्यापुढे चिंता आहे या धान्याची विल्हेवाट कशी लावायची. गोदामात धान्य ठेवायला जागा नाही आणि १ एप्रिलपासून नवीन गहूखरेदी करावा लागणार आहे. तो ठेवायचा कुठे? असा प्रश्न माझ्यापुढे आहे. शेतकऱ्यांमधला आत्मविश्वास जागृत करण्याची भूमिका घेतल्यामुळेच विक्रमी धान्योत्पादन झाले आहे. वाजपेयींच्या काळात गव्हाला भाव ६३० रुपये होता. आम्ही १०८० रुपये भाव दिला. त्यांच्या वेळी कापसाचा दर १८०० रुपये क्विंटल होता. आम्ही २८०० रुपये दर दिला. हे दर वाढवून दिल्यामुळे ग्रामीण भागातील सामान्य माणसाच्या हातात आज पैसा खेळताना दिसतो आहे. तुलनेने खेड्यापाड्यातील माणसाच्या हातात पहिल्यांदा पैसा गेला आहे. हे काम आमच्या सरकारने केले आहे. महाराष्ट्राप्रमाणेच केंद्रातही रोजगार हमीचा कायदा केला. २० हजार कोटींची तरतूद केली. कमीतकमी १०० दिवसांचा रोजगार दिला. यापूर्वी कधीही हे काम झाले नव्हते. शहरांसाठी किती पैसे खर्च केले? जेएनयूआरएम योजनेसाठी २५ हजार कोटी रुपये दिले. १४०० कोटी रुपये पुण्याला मिळाले आणि आणखीन साडेतीन हजार कोटीचे प्रस्ताव मंजूर केले आहेत. २००० कोटी रुपये पिंपरी-चिंचवडला मिळाले. तेथील रस्ते जाऊन बघा. पिंपरी-चिंचवड शहराचा आज पूर्ण कायापालट झालेला आहे. काम करण्यासंबंधीची दृष्टी असलेल्या व परिवर्तन करू इच्छिणाऱ्या आमच्या सरकारच्या पाठीशी उभं राहायचं, की माणसांची हत्या करणाऱ्या विषवल्ली वाढवायच्या याचा निर्णय तुम्हाला करावा लागणार आहे.

आजपर्यंत राजकारणात खूप वेळा संघर्ष झाले पण मूळ विचारधारा बदललेली नाही. अजूनही आम्ही मूळ विचारधारेतच आहोत. जिथे जिथे काँग्रेस-रिपब्लिकन पक्षाचा उमेदवार असेल तिथे तिथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्यांचे काम केले पाहिजे हे माझे आग्रही सांगणे आहे. जे या पद्धतीने काम करतील त्यांनाच पक्षात स्थान आहे. बाकीच्यांना स्थान नाही. आपल्याला एका नव्या संग्रामाला सामोरे जायचे आहे. उद्या माझे काय होणार याची ज्यांना चिंता पडलेली आहे त्यांना त्याचा लखलाभ होवो. आपण काँग्रेस-राष्ट्रवादी व रिपब्लिकनचे सर्व उमेदवार आणि राज्यातील सर्वच्या सर्व म्हणजे ४८ जागा जिंकू इच्छितो असे यश मिळवून महाराष्ट्र आपण मजबुतीने देशाच्या पाठीशी उभा करण्याच्या कामाला आता लागू या.

**(पुण्यातील काँग्रेस भवनात राष्ट्रवादी काँग्रेस–काँग्रेस पक्ष–रिपब्लिकन पक्ष आघाडीच्या प्रचाराचा प्रारंभ करताना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केलेले भाषण)**

## कर्जमाफी

▶ पान १ वरून

२००३-०४ अखेर देशाचा एकूण शेतीचा कर्जपुरवठा हा ८६ हजार कोटी रुपये होता. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे सरकार जेव्हा केंद्रात सत्तेवर होते, तेव्हा त्यांनी शेतीचा कर्जपुरवठा व तत्समच शेतकऱ्यांच्या कल्याणाकडे व शेतीमालाच्या आधारभूत किमती वाढवून देण्याकडे कधीही फारसे लक्ष दिले नाही; किंबहुना सातत्याने ग्राहकांचे कल्याण साधायचे आहे, या नावाखाली शेतकऱ्यांना मारण्याचेच वा त्यांची आर्थिक कोंडी करण्याचेच काम भाजपच्या काळात झाले होते. शेतकऱ्यांचा विकास हा त्यांचा कधीही मूलभूत व कळीचा कार्यक्रम नव्हता. मात्र, डॉ. मनमोहनसिंग हे पंतप्रधान झाल्यावर आणि शरद पवार यांनी केंद्रात कृषिमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर म्हणजे २००४ पासून गेल्या पाच वर्षांत सातत्याने शेती क्षेत्राचा कर्जपुरवठा वाढविण्यावर लक्ष केंद्रित करून आता हे उद्दिष्ट २ लाख ८० हजार कोटी रुपयांवर नेले आहे. २००७-०८ या वर्षात शेती क्षेत्राचा कर्जपुरवठा हा २ लाख २५ हजार कोटी रुपये करण्याचे उद्दिष्ट असताना प्रत्यक्षात बँकांनी २ लाख ४३ हजार कोटी रुपयांचा कर्जपुरवठा केला आहे. कर्जमाफीच्या योजनेचा फायदा ज्या शेतकऱ्यांना मिळाला नाही, त्यांना व ज्यांनी नियमित कर्ज भरले त्यांना काही प्रमाणात प्रोत्साहन व उत्तेजन मिळावे म्हणून महाराष्ट्र सरकारने स्वतःच्या तिजोरीतून ६ हजार २०८ कोटी रुपये शेतकऱ्यांना कर्जमाफीपोटी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय घेतल्याशिवाय मंत्र्यांना आम्ही मुंबईला येऊ देणारच नाही, अशी तंबी शरद पवार यांनी नागपूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्वसाधारण सभेत जाहीरपणाने दिली होती. आजपर्यंत शेतकऱ्यांना एवढी मोठी माफी कोणत्याही सरकारने देऊन प्रगतीसाठी हातभार लावलेला नव्हता. काँग्रेस - राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरकारने ही क्रांतिकारी व धाडसी योजना राबवून शेतकऱ्यांच्या जीवनात चैतन्याची एक नवी पहाट फुलविली आहे.

# दिशा क्रांतिकारी कार्याची

▶ पान १ वरून

कर्जाची रक्कम वाढली तरी आत्महत्या कमी होत नाहीत म्हणून बारकाईने पाहिले तेव्हा लक्षात आले, की कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या कमी झाली आहे. मर्यादित घटकांना कर्ज मिळाले आहे, हे असे का घडले? याची कारणे शोधली तेव्हा लक्षात आले, की थकबाकी हेच प्रमुख कारण आहे. मग त्याचा आढावा घेतला आणि ही थकबाकी माफ केली पाहिजे, अशी आग्रही भूमिका मी घेऊन तसा प्रस्ताव माझ्या कृषी विभागामार्फत केंद्रीय मंत्रिमंडळापुढे नेला. अर्थमंत्र्यांनी अशा पद्धतीने माझ्याकडे पाहिले, की देश चालवायचा की नाही? या कर्जमाफीचा फायदा देशभरातील साडेचार कोटी शेतकऱ्यांना झाला. महाराष्ट्राला जवळपास सात हजार कोटी रुपये मिळाले. पण तुम्ही एवढ्या खुशीने सांगितले, की शेतकऱ्यांचा सातबारा आम्ही कोरा करून देऊ. सगळ्यांचे कर्ज काही माफ करता आले नाही. त्यामुळे काही शेतकऱ्यांची नाराजी झाली. मग राज्य सरकारनेदेखील काही जबाबदारी उचलावी, असा आग्रह आपण धरला आणि वीस हजारांच्या आतली रक्कम भरायचे राज्य सरकारने मान्य केले. सहा हजार दोनशे कोटी रुपयांची कर्जमाफीची रक्कम महाराष्ट्र सरकारने भरली. या दोन्ही कर्जमाफीचा ७० टक्के शेतकऱ्यांना फायदा झाला आहे. आणखीन ३० टक्के लोक राहिले आहेत. पुढच्या अंदाजपत्रकात उर्वरित लोकांचा विचार करू.

### बलुतेदारांसाठी कर्जमाफी देणार

आज आपण ज्याला जमीनजुमला आहे, त्याचे प्रश्न सोडविण्यासाठी पावले टाकली; पण त्या बळिराजाच्या शेतात राबणारा जो बारा बलुतेदार आणि मजूर आहे आणि ज्याने वेगवेगळ्या महामंडळांची कर्जे घेतलेली आहेत, त्या गरीब लोकांना जगण्यासाठी लहानशी मदत म्हणून २०० ते ३०० कोटी रुपये कर्जमाफीपोटी द्यावे लागणार आहेत. ते प्राधान्याने देण्याचा प्रयत्न करू.

फळबाग योजना देशभर ठ्या प्रमाणात राबविली आहे. बांबू आपल्याकडे फारसा होत नाही. नॉर्थ ईस्टमध्ये बांबू मोठ्या प्रमाणावर लावला जातो. तिथे तो वाढीला लागावा म्हणून बांबू मिशन स्थापन केले आहे. सगळा देशाला परिवर्तनाच्या रस्त्यावर नेण्याचा प्रयत्न माझ्या विभागाने केला.

सामान्य माणसाचे महागाईसारखे महत्त्व प्रश्न निकालात निघाले. १२ ते १३ टक्क्यांवर गेलेला महागाई निर्देशांक ३.३६ टक्क्यांवर आणला असून, तेलासाठी लाखो रुपयांची सबसिडी दिलेली आहे. एकंदरीत सगळ्या गोष्टींचे भाव खाली येत आहेत. महामंदीचे दुष्पपरिणाम भारतातही आहेत; पण अमेरिकेइतकी मंदी आपल्याकडे नाही. आपल्याकडे तेवढा मंदीचा परिणाम जाणवत नाही, कारण शेतीमालाला व चांगला मिलेला आहे. नाशिकमध्ये कांद्याच्या प्रश्नावर आता कोणी फारसे बोलत नाही. कांदा फेकल्याचेही ऐकायला मिळालेले नाही. हा सगळा बदल आम्ही स्वीकारलेल्या नवीन धोरणांमुळे घडून आला आहे.

नुकतेच पिंपळगाव येथे नरेंद्र मोदींनी केलेले भाषण वाचले. सगळा महाराष्ट्र ते गुजरात करायला निघालेले आहेत; पण आम्हा महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींना महाराष्ट्राचा गुजरात करायची तसूभरही इच्छा नाही. लोकप्रतिनिधींना घरात जाळण्याचे उदाहरण जे अहमदाबादमध्ये पाहायला मिळाले, ते आम्हाला नको आहे. गोध्रा हत्याकांडात माणसे जिवंत जाळण्यात आली. आमचे एक-दोन प्रश्न सुटले नाहीत तरी चालेल; पण आम्ही महाराष्ट्राचा गुजरात होऊ देणार नाही. तुम्हाला अभिप्रेत असलेला गुजरात आम्हाला नको आहे.

मोदी ज्या भाजपचे गुणगान गातात त्या भाजपचे देशात सरकार असताना गव्हाला फक्त ५५ रुपये भाववाढ दिली होती. आम्ही ती ५०० ते ५८० रुपये केली. गहू, बाजरी, धानाच्या आधारभूत किमती अत्यंत कमी होत्या. त्या आम्ही वाढवून दिल्या. मोदींनी थोडीशी आधी माहिती घ्यावी आणि मगच बोलावे. या गड्याला अजून शेती, जमिनीसंबंधी फारसे काही माहिती नाही. त्यामुळे त्यांचे बोलणे फार गांभीर्याने घेण्याची गरज नाही.



### कापूस उत्पादकांच्या घरात तीन हजार कोटी रुपये जास्त

**शेतकऱ्यांना कपाशीसाठी सरासरी २७०० ते २८०० रुपये भाव मिळाला. कापूस उत्पादकांना दर क्विंटलमागे ५०० ते ७०० रुपये जादा मिळालेले आहेत. सरासरी ६०० रुपये प्रति क्विंटलमागे जादा भाव मिळाल्यामुळे महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या घरात २५०० ते ३००० कोटी रुपये जास्तीचे जाऊ शकले. त्यामुळे कुठेही कपाशीच्या भावासाठी या वर्षी 'रास्ता रोको' झाला नाही. मार्केट बंद पाडले गेले नाही.**

### युद्ध हे सगळ्या प्रश्नांचे उत्तर नव्हे

काही गोष्टी देशाला धक्का देणाऱ्या घडल्या आहेत. अतिरेकी हल्ले होताहेत. देशात अनेक ठिकाणी बॉंबस्फोट झाले. २६ नोव्हेंबरला मुंबईवर हल्ला झाला. सबंध देश अस्वस्थ झाला. कठोर भूमिका देशाने घेतली. सगळ्या जगातला महत्त्वाचा दहशतवादी देश म्हणून आज पाकिस्तानकडे पाहिले जाते. त्याला वेगळे पाडण्यात आणि त्याच्यावर जागतिक दबाव आणण्यात भारत यशस्वी झाला. सगळ्या जगाने दहशतवादाच्या प्रश्नांवर भारताच्या बाजूने भूमिका घेतली. काही लोक पाकिस्तानशी युद्ध करावे, असे सारखे घोकत होते; पण शेवटी युद्ध हे काही त्याचे उत्तर नव्हे. ज्यांच्या हातात जन्मभर काठी व हाफपँट होती, त्यांनी जाऊन भाषणे करायची इंच इंच लढवू. १९६५ मध्ये युद्ध झाले. आम्ही सगळे विद्यार्थी त्या वेळी भारावून जाऊन देशासाठी लढायला तयार झालो होतो. त्या वेळी दत्तो वामन पोतदार हे पुणे विद्यापीठाचे कुलगुरू होते. ३० ते ३५ हजार विद्यार्थी कुलगुरूंना भेटायला गेले. देशासाठी आम्ही रक्त, प्राण द्यायला तयार आहोत, असे सांगितले. आमच्यातल्या एका अगदी बारीक किरकोळ शरीरयष्टी असलेल्या विद्यार्थ्याला पोतदारांनी विचारले, की तुझी छाती फुगवून किती? जन्मभर फक्त हाफपँट घालवून संघ दक्ष करण्यात ज्यांचा जन्म गेला, त्यांनी निव्वळ पोकळ बाता मारू नयेत. त्यांच्या बोलायच्या आणि करायच्या गोष्टी वेगवेगळ्या असतात.

### मालेगावातील अतिरेकी कुठून आले?

चुकीच्या रस्त्याने जाण्याची भूमिका आपल्याला स्वीकारता येणार नाही. सगळ्या जगाला बरोबर घेऊन जाऊन आपण पाकिस्तानला वेगळे पाडले आहे. त्यामुळे पाकिस्तानात मोठी अस्वस्थता आहे. या बॉंब मालिकांची तपासणी केली, तेव्हा अतिरेकी घटक कुठून येतात, हे तपासले. देशातल्या लोकांबद्दल आकस निर्माण करण्याचे काम हे अतिरेकी शक्तींमुळे घडते आहे. कुणी केला मालेगावचा हल्ला? कुणी साध्वी यात आघाडीवर होती, असे म्हणतात. भगवद्‌गीता हे असले शिक्षण देते का? लष्करातला अधिकारी ज्याला सन्मानाने देशाच्या रक्षणासाठी पाठविले तो या बॉंबस्फोटात सहभागी होता. नांदेडला बॉंब तयार करताना कोण मृत्युमुखी पडला? पूर्णेजवळ बॉंब सापडला, अजमेरजवळ बॉंब सापडला. कुणी मुस्लिम बांधव त्यात नव्हते. कुठेही बॉंबस्फोट म्हटला, की आधी मुस्लिमांकडे संशयाने बघितले जाते. असे बघणारेच देशाच्या ऐक्याला खरा धक्का देत आहेत. आपल्या देशात वेगळे वातावरण मुस्लिमांच्याबद्दल तयार केले जाते आहे. त्याचा पुरस्कार आमचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कधीही करणार नाही. मालेगावचे प्रकरण बाहेर आल्यानंतर देशातील बॉंबस्फोटांची मालिका कोण घडवून आणते आहे, कोणत्या प्रवृत्ती यामागे आहेत, त्यांना कसे रोखायचे, या सर्व प्रश्नांत बारकाईने लक्ष घालून व डोके शांत ठेवून भूमिका घेतली पाहिजे. इतकेच नव्हे, तर या लहान घटकाला संरक्षण देण्याची भूमिका आग्रहीपणाने मांडली पाहिजे.



### विक्रमी धान्य उत्पादन

**गेल्या वर्षी साडेचार टक्के कृषी विकासाचा दर गाठण्याचा संकल्प केला होता. तो गाठण्यात आपण यशस्वी झालो. गहू, तांदूळ यांची विक्रमी खरेदी झाली. आज ७० टक्के गोडाऊन भरलेली आहेत. ती रिक्त कशी करायची, असा मला प्रश्न आहे. प्रचंड प्रमाणात धान्याचे उत्पादन झाले आहे. जगातल्या सहा ते सात देशांना गहू पुरविण्याचे काम भारताने केले आहे. शेतकऱ्यांनी घामातून जे उत्पन्न वाढविले त्याबद्दल त्यांचे करावे तेवढे कौतुक थोडे आहे. आता म्हणूनच खताची सबसिडी यापूर्वी ५१ हजार कोटी रुपये होती. ती १ लाख १९ हजार कोटींवर नेली.**

### गरिबांना संधी मिळाली पाहिजे

**मराठा समाजाला आरक्षण देण्यासंबंधीचा विचार आता पुढे आला आहे. मी सुरवातीपासूनच स्वच्छ भूमिका घेतली आहे. जो गरीब आहे त्याला संधी मिळाली पाहिजे. पिढ्यान्‌पिढ्या अडचणीत असलेल्या माणसाला मदतीचा हात आपण दिला पाहिजे. ओबीसींसाठी जे आरक्षण ठेवलेले आहे, त्याला तसूभरही धक्का लागू दिला जाणार नाही. मराठा समाजाला त्यातून एक टक्काच काय; पण पाव टक्कादेखील आरक्षण दिले जाणार नाही. ओबीसींचे आरक्षण कायम ठेवले जाईल. मराठा समाजातील लोकांना शिक्षण, नोकरी यांच्या संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत, याविषयी माझ्या मनात दुमत नाही.**



**डॉ. स्वामिनाथन**

**शरद पवारांनी आम्हा शास्त्रज्ञांकडून विविध पिकांच्या उत्पादनाची हमी मागितली. गहू, ज्वारी यांचे सुधारित अथवा संकरित बियाणे वापरून व योग्य ती पिकांची काळजी घेऊन विशिष्ट प्रमाणात उत्पादन मिळाले पाहिजे, अशी ती योजना होती. त्याचा फायदा झाला. त्यांनी तेव्हापासूनच उत्पादकतेवर भर दिला आणि एका 'उत्पादकता क्रांती'ची सुरवात केली.**



**भवरलाल जैन**

**ठिबक सिंचन, फळबाग व पाणलोट क्षेत्र विकास, तसेच उपसा जलसिंचन या बाबतीमध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण, प्रसंगी क्षोभास कारणीभूत ठरणारे; परंतु सडेतोड निर्णय घेऊन शरद पवारांनी सिंचनविषयक धोरणास क्रांतिकारक वळण दिले.**



**डॉ. रघुनाथ माशेलकर**

**शरद पवार यांनी जैवतंत्रज्ञानावर दिलेला भर हा आपल्या भवितव्यासाठी फार महत्त्वाचा आहे. शेतीसाठी जैवतंत्रज्ञान अतिशय उपयुक्त आहे. ही उपयुक्तता त्यांनी ओळखली आहे. त्यांनीच आयोजिलेल्या जैवतंत्रज्ञान कार्यशाळांत मी अनेकदा सहभागी झालो आहे. हे तंत्रज्ञान सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोचावे, यासाठीची त्यांची कळकळ मी स्वतः पाहिलेली आहे. ते नेत्यांचे नेते आहेत.**



**ना. धों. महानोर**

**स्वातंत्र्योत्तर पन्नास वर्षांच्या काळात कृषीविषयी प्रेम असलेले कृषिमंत्री होते; परंतु नुसतं प्रेम असून उपयोग नाही. अविश्रांत परिश्रम करणारा व जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी आज 'कृषी' तेवढं पाहणारा कृषिमंत्री भारताला पहिल्यांदा भेटला. शरदरावांची कृषीविषयक नीती देशाचं अर्थकारण सुदृढ केल्याशिवाय राहणार नाही...**